# मनाला भिडणारी लावणी

**डॉ. विनोद गोरवाडकर,**
समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, -
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
नामपूर, जि. नाशिक.
मो. ९४२३४७७२७३

लटपट लटपट तुझं चालणं
मोठ्या नखऱ्याचं
बोलणं गं मंजुळ मैनेचं
नारीगं नारीगं नारीगं ॥
कांती नवयुवतीची
दिसे चंद्राची प्रभा ढवळी
जाईची येल कवळी
दिसणार सुकुमार
नरम गाल व्हट कवळी
जशी चवळीची शेंग कवळी
तारुणपन अंगात उडे वीज
बोलणं गं मंजुळ मैनेचं
नारीगं नारीगं नारीगं
लटपट लटपट......

- (लावणी) शाहीर होनाजी

शृंगार हा साहित्यातील नवरसांपैकी एक प्रमुख रस. या रसाचा सर्वानुअंगे वापर करुन तयार केलेले गीत म्हणजे लावणी. ही लावणीची अगदी ढोबळ व्याख्या. लावणी म्हणजे काय हे पुढील मजकूरात येईलच. पोवाडा आणि लावणी हे शाहिरीचे प्रमुख दोन काव्य प्रकार आहेत. पोवाड्यात वीररसाचा आणि लावणीत शृंगार रसाचा वापर शाहीर करीत. उत्तर पेशवाईच्या काळात लावणीस भाग्याचे दिवस आले पण लावणी त्यापेक्षाही प्राचीन आहे. लावणीच्या प्राचीनतेविषयी आजही अनिश्चितता असली तरी साधारणतः शिवकाळात लावणीचा उगम झाला असे मानले जाते. अर्थात त्यावेळी लावणीचे प्रमाण अत्यल्प होते. परंतु नवीन संशोधनाद्वारे एकनाथांच्या काळातील लावण्या सापडल्या आहेत. त्यामुळे लावणीला अत्यंत प्राचीन परंपरा असल्याचे त्यावरुन सिद्ध होते. अस्सल मराठी मातीतून जन्माला आलेली लावणी नावाची ही लावण्यवती आहे.

लावणी वाङ्मयाकडे बघता लावणीची प्रामुख्याने जोपासना पुणे व पुण्याच्या आसपासच्या परिसरात झाली असावी असे मानले जाते. असे असूनदेखील लावणी पूर्ण महाराष्ट्रात पसरली. लावणी हा मराठी मनाचा ठाव घेणारा जबरदस्त काव्यप्रकार असल्यानेच पूर्ण महाराष्ट्रात लावणी फोफावली.

लावणीला शिवकाळात विशेष स्थान नव्हते. शिवरायांच्या काळात चैन, मौज, षौक ह्या प्रकारांना वाव नव्हता. त्यामुळे लावणी तेव्हा वाढली नाही. मात्र लावणीला खरे महत्त्व पेशवाईच्या उत्तरार्धात प्राप्त झाले. उत्तर पेशवाईत लावणी विशेष जोषात होती. तत्कालीन मोठमोठ्या शाहीरांनी, जवळजवळ साऱ्याच शाहीरांनी पेशव्यांच्या दरबारात हजेरी लावल्याचे सर्वख्यात आहे.

प्राचीन काळात शिवशक्तीची उपासना करणारे जे उपासक असत ते आपल्या उपास्य देवतास आपल्या काव्यातून दोघांपैकी कोण श्रेष्ठ आहे ते दाखवीत व तीच पद्धती आजही रुढ आहे. शिवपक्ष म्हणजे आजचा तुरेवाला पक्ष आणि शक्तीपक्ष म्हणजे आजचा कलगीवाला पक्ष होय.

लावणी गाणाऱ्यांमध्ये कलगीवालें व तुरेवाले हे दोन मोठे पक्ष आहेत. एकाने अध्यात्मीक प्रश्न काव्यात विचारायचा आणि दुसऱ्याने त्याचे लगेच काव्यातच उत्तर द्यावयाचे. उत्तर देता आले नाही तर तो पक्ष हरला असे समजले जाते व विजयी पक्षाला मोठे बक्षिस दिले जाते.

आजचे लावणीचे स्वरुप हे बदलत आलेले रुप आहे. तरी देखील लावणीचे मूळ खास प्राचीन असल्याने लावणीला एक विलोभनीय परंपरा लाभली आहे.

लावणी म्हणजे नेमके काय? हे पुढीलप्रमाणे सांगता येईल. ''लावणी'' ह्या शब्दाचा अभ्यासाद्वारे वेगवेगळा अर्थ तज्ञांनी काढलेला आहे.

१) लवन म्हणजे सुंदर आणि लावण्य म्हणजे सौंदर्य. सौंदर्याचे दर्शन जिच्यात होते ती म्हणजे लावणी. २) काळजाला चटका लावते ती लावणी. ३) शेतात पीकाची लावणी करतांना म्हटले जाणारे गीत म्हणजे लावणी. ४) व्यवस्थित मांडणी करण्याला लावणे म्हणतात. त्यावरुन सुबद्ध रचना, व्यवस्थित साचेबद्धपणा ज्या काव्यात आहे ती लावणी.

वरील वेगवेगळे अर्थ तज्ञांनी काढले असले तरीही लावणीचे योग्य विश्लेषण प्रा. म. वा. धोंड यांनी त्यांच्या व्याख्येत केले आहे. ते म्हणतात..... 'सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनासाठी त्यांना रुचतील अशा लौकीक, पौराणिक वा आध्यात्मीक विषयावर रचलेली कडे आणि ढोलकी यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज सफाईदार पद्मावर्तनी व भृंगावर्तनी जाती रचना म्हणजे लावणी होय.'' प्रा. धोंड यांच्या व्याख्येवरुन लावणी नेमकी कशी असावी ते लक्षात येते.

प्रा. धोंड यांच्या व्यतिरिक्त ज्या व्याख्या लावणीचा अर्थ सांगतात, त्याही त्यांच्या जागी योग्यच वाटतात यात संशय नाही.

साधारणतः लावणीचे ३ प्रकार पडतात, ते खालीलप्रमाणे–

१) शृंगारीक लावण्या

२) विविध विषयांवर लावण्या

३) आध्यात्मिक वा भेदीक लावण्या..

RESEARCH JOURNEY

शृंगारीक लावण्यात नांवाप्रमाणेच शृंगाराचा वापर केलेला असतो. अतिउत्तान वा सौम्य अशा दोन्ही प्रकाराच्या शृंगाराचे वर्णन यात असू शकते. लावणी केवळ शृंगारालाच वाहिलेली नाही तर तीत वेगवेगळे विषयही हाताळले जातात हे लावणीच्या दुसऱ्या प्रकारांवरुन लक्षात येते तर तिसऱ्या प्रकारात अध्यात्मिक म्हणजेच भेदीक लावणी तयार केली जाते. वरील तिन्ही प्रकारातील एक एक उदा. दाखल लावण्या पुढीलप्रमाणे–

* शृंगारीक लावणी

कोण्या ग सुभगाची मदनमंजरी। सांग सखे सुंदरी
इच्या सौंदर्यांची सीमा।
झाली गडे रतिहूनी अति उत्तमा।
पाहूनिया मुख चंद्रमा।
सखे गडे असा गमती पौर्णिमा
काय अधराची रतिमा।
लाजवी नव कुंकम विदुमा
अंगी वसन जिच्या भर्जरी। कोण्या गं सुभगाची मदन मंजरी

\- शाहीर रामजोशी

* विविध विषयपर लावणी

नर जन्मामधी नरा करुन घे
नर नारायण गडी
तरीच हे सार्थक मानव कडी ॥धृ॥
बा चौऱ्यांशी लक्ष वेळ
संसार पडला गळा
चिंतेचा पिकला मळा
दार धनाचा लोभ टाकूनी झटकन हो वेगळा
कसा उकलशील पिळा ॥१॥

* अध्यात्मीक लावणी

कोरा चंद्र डागला
थट्टेच्या मुळे ॥धृ॥
चंद्र गणेशासी हसला
शनि विक्रमासी आला
भगे पडली त्या इंद्राला अहिल्येमुळे ॥१॥
- शाहीर पठ्ठे बापुराव

आज लावणी गायनामध्ये साधारणतः ३ प्रकार पडतात. पहिला प्रकार बैठकीची लावणी. दुसरा प्रकार कडे ढोलकीची लावणी आणि तिसरा प्रकार पेटी तबल्यावरील लावणी हा होय. यापैकी बैठकीची लावणी तुटक तुटक असते. परस्पर संबंध नसलेली अशी ही लावणी असते. म्हणजे त्या त्या बैठकीत ती लावणी संपते किंवा एका लावणींचा दुसऱ्या लावणीशी काहीही संबंध नसतो. एका लावणीपुरताच तिचा विषय असतो. कडे–ढोलकीची लावणी ही अशी नसते. एका कडव्याचा पुढील कडव्याशी संबंध असणारी ही लावणी एखाद्या अध्यात्मीक वा पौराणिक विषयांवर गुंफलेली असते. कीर्तनात ज्याप्रमाणे पद्य भाग व गद्य भाग ही पद्धत अवलंबली जाते, त्याप्रमाणेच ही लावणी म्हटली जाते. दोन्ही पद्य भागामध्ये गद्य भाग सांगितला जातो. त्या गद्य भागास संपादनी म्हणतात. हा सोंगाड्या फार हजरजबाबी, विनोदी आणि चतुर असावा लागतो. अलंकारिक उपमा देण्यात पटाईत असणारा सोंगाड्या लोकप्रिय होतो. पेटी तबल्यावर म्हटल्या जाणाऱ्या लावणीचा जो तिसरा प्रकार आहे तो फक्त नाचणाऱ्या ज्या बाया असतात त्याच वापरतात. पेटी तबल्याच्या साथीत लावणी म्हणून नृत्य केले जाते. या नाचणाऱ्या बायांच्या फडास संगीत बारी म्हटली जाते. लावणी ही वेगवेगळ्या रागदारीत म्हटली जावू शकते. काही लावण्या संविधानकात म्हटल्या जातात. त्या संविधानकास वग म्हणतात.

संगीत बाऱ्यात म्हणजे तमाशात ७ लोक असतात. नायक, नायिका खलनायक, तुणतुणेवाला, ढोलकीवाला, सोंगाड्या (संपादनी करणारा) जीरं , जीगं, सावळ्या रामा, दाजी, जीजी असे पूर्णार्थी शुद्ध लावणीच्या शेवटी उच्चारले जातात. त्याला झील म्हणतात. हे शब्द पाठीमागून म्हणणाऱ्यास झीलकरी म्हणतात. वरील ७ लोकात एक झीलकारी असतो.

संगीत बाऱ्यात वग कधीच येत नाही. प्रत्येक वेळी वेगवेगळी लावणी म्हटली जाते. या सर्व प्रकारांशिवाय भेदीक लावणी हा जो प्रकार आहे, यात मर्मभेदक सवाल प्रतिपक्षास केले जातात व त्याचे उत्तर देता न आल्यास तो पक्ष हरला असे समजले जाते.

हल्लीच्या म्हटल्या जाणाऱ्या लावण्यांपैकी बऱ्याचशा लावण्या ह्या जुन्या कवींच्या, शाहीरांच्याच आहेत. पठ्ठे बापुराव कुलकर्णी, अनंत फंदी, रामजोशी, होनाजी बाळा असे अनेक कवी, शाहीर लोक लावणीच्या लावण्यात अडकलेले दिसतात. एकूण शाहिरी वाङ्मयात पोवाडे कमी आणि लावणी जास्त असे प्रमाण आहे.

लावणीचा मुखडा हे तिचे आकर्षण असते, असे समजले जाते. मुखड्यातच श्रोत्यांना जिंकण्यावर लावणीचे यश अपयश अवलंबून असल्याने शाहीरांनी लावणीच्या मुखड्यावरच अधिक भर दिलेला दिसतो. त्यातील काही उदा. दाखल मुखडे–

साऱ्या गावाचे ओव्हळ मिळूनी गंगेची करी ती थट्टा
सोनार शिक्का नवा निघाला पंधरा आने जरी बट्टा
शाहीर परशुरामाने ही लावणी लिहिली आहे.
झुळ झुळ वारा वाहतो चांदणे थंड गं
झग झग तारे करीती आकाशी उदंड गं
- शाहीर प्रभाकर

सर्वच लावण्या शृंगार रसात बुडविलेल्या असतात असे नाही. काही लावण्या काळजाला हात घालणाऱ्या आहेत. जुन्या लावण्यात आधुनिक काळाचे ध्वनी काढण्यातही शाहीर यशस्वी झाले आहेत. त्याचबरोबर अध्यात्मिक, उपदेशपर वा भक्तीरसयुक्त लावण्याही शाहीरांनी लिहिलेल्या आढळतात. पतीचा विरह, कूट प्रश्न यासारखे विषयही लावणीद्वारे हाताळले गेले आहेत.

संदर्भ ग्रंथ :

१. लोकरंगभूमी – डॉ. प्रभाकर मांडे
२. दिंडी लोककलांची – विनोद गोरवाडकर
३. मऱ्हाटी लावणी – प्रा. म. वा. धोंड
४. लोकसंस्कृतीचे उपासक - रा.चिं. ढेरे
५. लोकरहाटीच्या वाटे - डॉ. गंगाधर मोरजे